जिल्ह्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आ. सुधीर मुनगंटीवार सरसावले; तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाईची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

आ. मुनगंटीवार यांचे महसूल व मदत-पुनर्वसन विभागाला पत्र; जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून तातडीच्या कार्यवाहीचे निर्देश

नुकसानग्रस्त एकही शेतकरी, नागरिक मदतीपासून वंचित राहू नये"; भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गावागावांत पंचनाम्यांसाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आ.मुनगंटीवार यांचे आवाहन

चंद्रपूर - चंद्रपूर जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीत शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी तातडीने पुढाकार घेतला आहे. मुल, बल्लारपूर, पोंभूर्णा, चंद्रपूरसह अनेक तालुक्यांतील शेती, घरे, जनावरे, शेतबांध, रस्ते तसेच वर्धा व इरई नदीकाठच्या गावांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची गंभीर दखल घेत आ.मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना पत्र पाठवून तात्काळ पंचनामे करून बाधितांना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस,अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल), अतिरिक्त मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) तसेच मुख्य सचिव आणि महसूल आयुक्त (नागपूर) यांना पत्र पाठवून चंद्रपूर जिल्ह्यातील परिस्थितीची माहिती देत नुकसान भरपाई देण्यासंदर्भाची मागणी केली आहे. यासोबतच चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या.

पत्रात आ.मुनगंटीवार यांनी नमूद केले आहे की, सलग चार दिवसांच्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर शेती पाण्याखाली गेली असून उभी पिके उद्ध्वस्त झाली आहेत. अनेक ठिकाणी घरे, गोठे, शेतबांध, रस्ते व इतर मालमत्तेचे नुकसान झाले आहे. वर्धा आणि इरई नद्यांना आलेल्या पुरामुळे नदीकाठच्या गावांमध्ये पाणी शिरून शेतीसह गावांनाही मोठा फटका बसला आहे. त्यामुळे महसूल व कृषी विभागाने तातडीने संयुक्त पाहणी करून नुकसानीचे पंचनामे पूर्ण करावेत आणि शासनाच्या नियमांनुसार नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना त्वरित आर्थिक मदत आणि नुकसानभरपाई अदा करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

याशिवाय, ज्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे त्या भागांसाठी विशेष मदत जाहीर करून अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याचीही आ.मुनगंटीवार यांनी मागणी केली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी व नागरिकांना तातडीने दिलासा मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच शासनाने या गंभीर परिस्थितीची संवेदनशीलतेने दखल घेऊन तातडीने आवश्यक निर्णय घ्यावेत, असे पत्रात नमूद केले आहे.

दरम्यान, या संकटाच्या काळात एकही शेतकरी किंवा नागरिक मदतीपासून वंचित राहता कामा नये, असे स्पष्ट करत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी भारतीय जनता पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना गावागावात जाऊन नुकसानग्रस्तांना मदत करावी, प्रशासनाला पंचनाम्यांसाठी सहकार्य करावे आणि पात्र लाभार्थ्यांचे नुकसान शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे पूरग्रस्त शेतकरी आणि नागरिकांना लवकरात लवकर न्याय मिळेल, नुकसानभरपाईची प्रक्रिया गतिमान होईल आणि संकटग्रस्त कुटुंबांना त्वरित दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 6624 /ऑगस्ट/२०२६ दिनांक : १.८.२०२६

प्रति,

**मा. ना. देवेंद्रजी फडणवीस**
मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

सप्रेम वंदे मातरम्!

**विषय**: चंद्रपूर जिल्हयात मागील ४ दिवसापासून सुरू असलेल्या मुसळधार पाऊसामुळे निर्माण झालेल्या पुरपरिस्थीतीमध्ये नुकसानीचे पंचनामे करून संबंधितांना नुकसान भरपाई अदा करण्याबाबत.

**महोदय,**

चंद्रपूर जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मुल, बल्लारपूर, पोंभुर्णा व चंद्रपूर यासह अनेक तालुक्यांतील जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकऱ्यांचे व सामान्य नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सततच्या पावसामुळे उभी पिके पाण्याखाली गेली असून शेतीचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच अनेक ठिकाणी घरे, गोठे, शेतबांध, रस्ते व इतर मालमत्तेचेही नुकसान झाले आहे. तसेच चंद्रपूर जिल्हयातील वर्धा व इरई या दोन्ही नदींना पुर आल्याने नदी काठावरील गावांमध्ये पुराचे पाणी शिरून शेतपिकांचे व गावाचे सुध्दा मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून संबंधितांना नुकसान भरपाई अदा करणे आवश्यक आहे.

या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिक मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे महसूल व कृषी विभागाच्या यंत्रणेमार्फत तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून

....२



।। वृक्ष लावा, वृक्ष जगवा ।। पत्ता : 'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र. 07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक :

दिनांक :



नुकसानीचे पंचनामे करण्यात यावेत. तसेच शासनाच्या प्रचलित नियमांनुसार बाधित शेतकरी व नागरिकांना तात्काळ आर्थिक मदत व नुकसानभरपाई अदा करण्यात यावी.

याशिवाय, ज्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे त्या भागांना विशेष मदत जाहीर करून आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून बाधित नागरिकांना त्वरित दिलासा मिळू शकेल.

आपण या गंभीर बाबीची तातडीने दखल घेऊन संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात व नुकसानग्रस्तांना लवकरात लवकर मदत उपलब्ध करून देण्यासंदर्भात पुढील योग्य कार्यवाहीसाठी संबंधितांना आदेश द्यावेत, अशी मी आपणास विनंती करीत आहे.

कार्यवाहीची सविस्तर रूपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

सविनय धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत माहितीस सादर :

१. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर
२. मा. पोलिस अधिक्षक, चंद्रपूर
३. मा. तहसिलदार, चंद्रपूर, मुल, बल्लारपूर व पोंभुर्णा
४. श्री. श्रीनिवास जंगमवार, अध्यक्ष भाजपा चंद्रपूर तालुका मु.पो. दुर्गापूर ता. जि. चंद्रपूर
५. श्री. चंदू मारगोनवार, अध्यक्ष भाजपा मुल तालुका मु.पो. बेंबाळ ता. जि. चंद्रपूर
६. श्री. चंद्रकांत देवूळकर, अध्यक्ष भाजपा बल्लारपूर तालुका मु.पो. नांदगांव पोडे, ता. बल्लारपूर
७. श्री. हरी ढवस, अध्यक्ष भाजपा पोंभुर्णा तालुका मु.पो. चेक आष्टा ता. पोंभुर्णा, जि. चंद्रपूर



।। वृक्ष लावा, वृक्ष जगवा ।। पत्ता :'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र.07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)